भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०११-१२/२४९
डीबीओडी.क्र.एलईजी. बीसी ४८ /०९.०७.००५/२०११-१२ नोव्हेंबर ४, २०११

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (आरआरबी सोडून)

महोदय,

**ग्राहक सेवा-बचत खाते धारकांना (व्यक्तिगत) पासबुके न दिली जाणे**

कृपया आमचे वरील विषयावरील परिपत्रक डीबीओडी. क्र. एलईजी.बीसी.३२/०९.०७.००५/२००६-०७ दिनांक ऑक्टोंबर ४, २००६ चा संदर्भ घ्यावा. त्यात बँकांना सांगण्यात आले होते की त्यांनी सर्व बचतखाते धारकांना (व्यक्तिगत) पासबुकची सुविधा द्यावी आणि ग्राहकाने खाते विवरणपत्राला पसंती दिल्यास बँकांनी त्याला दरमहा खाते विवरणपत्र द्यावे. असे पासबुक किंवा खातेविवरणपत्र देण्याचा खर्च ग्राहकाला लावण्यात येऊ नये.

२. आमच्या असेही नजरेस आले आहे की काही बँका त्यांच्या बचत खातेदारांना पासबुके देत नाहीत, ग्राहकाला पासबुक-सुविधा हवी असली तरीही त्याला संगणकनिर्मित लेखा विवरणपत्र देतात. ह्यासाठी, वरील परिपत्रकातील सूचना काटेकोरपणे पाळण्याबाबत बँकांना सांगण्यात येत आहे.

आपला,

(दीपक सिंघल)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक